दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
Scan QR code to visit ... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १८४ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.६ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

### मविआतील बिघाडास अशोक चव्हाण जबाबदार ; जाणीवपूर्वक घोळ केल्याचा काँग्रेसला संशय

## नाचता येत नाही आणि अंगण वाकडे अशी काँग्रेसच्या राज्यातील नेत्यांची परिस्थिती - अशोक चव्हाण

**मुंबई (वृत्तसंस्था)-महाविकास आघाडीमध्ये जागा वाटपाचा पेच अद्याप सुटलेला नाही. यामध्ये प्रामुख्याने सांगली, भिवंडी आणि दक्षिण मध्य मुंबई मतदारसंघांचा समावेश आहे. हे मतदारसंघ काँग्रेसचे पारंपरिक मतदारसंघ होते. मात्र, असे असताना उद्धव ठाकरे आणि शरद पवार गटाने या मतदारसंघावर दावा केला आहे. हे मतदारसंघ काँग्रेसचे असताना देखील या मतदारसंघावर फारशी चर्चा न करता इतर मतदारसंघाबाबत काँग्रेसने दावा केला. त्यामुळे सुरुवातीलाच हे मतदारसंघ महाआघाडीमध्ये दुसऱ्या पक्षांच्या ताब्यात गेले. या सर्वात महत्त्वाची भूमिका ही अशोक चव्हाण यांनी बजावली असल्याचा आरोप आता करण्यात येत आहे. चव्हाण यांनी जाणीवपूर्वक घोळ करून ठेवला का? असा संशय काँग्रेसचे नेते व्यक्त करत आहेत.**




महाविकास आघाडीमध्ये काँग्रेसच्या वाट्याला असलेल्या सांगली, भिवंडी आणि दक्षिण मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघ हे आता महाआघाडीच्या चर्चेतील कळीचा मुद्दा ठरत आहेत. हे मतदारसंघ देताना काँग्रेसने अधिकचे लक्ष दिले नाही. त्यावेळी वाटाघाटीची जबाबदारी ही अशोक चव्हाण यांच्याकडे होती. मात्र, अशोक चव्हाण यांनी जाणीवपूर्वक या जागांकडे लक्ष दिले नसल्याचा आरोप आता काँग्रेसचे नेते करत आहेत. तर दुसरीकडे रामटेक, कोल्हापूर आणि अमरावती मतदारसंघावर उद्धव ठाकरे गटाचा दावा होता. मात्र या मतदारसंघातून काँग्रेसने उमेदवार दिल्यामुळे इतर तीन मतदारसंघ काँग्रेसच्या ताब्यातून निघाले असल्याचा दावा महाआघाडीतील इतर घटना पक्ष करत आहेत.महा विकास आघाडीमध्ये जागा वाटपाबाबत चर्चा सुरू असताना सुरुवातीच्या काळापासूनच माजी मुख्यमंत्री तथा ज्येष्ठ नेते अशोक चव्हाण हे काँग्रेसच्या वतीने चर्चा करत होते. मात्र, ही चर्चा अर्धवट असतानाच अशोक चव्हाण यांनी अचानक काँग्रेस पक्षाचा राजीनामा देत भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला. त्यामुळे अशोक चव्हाण यांनी आधीच ठरवून काँग्रेसचे महत्त्वाचे मतदार संघ हे उद्धव ठाकरे आणि शरद पवार गटाला दिले असल्याचा आरोप आता काँग्रेसचे नेते करत आहेत.काँग्रेस नेत्यांना तिकीट वाटपामध्ये अपयश आले आहे. या अपयशाचे रूपांतर काही दिवसांनी पराभवात होणार आहे. त्याचे खापर माझ्यावर फोडण्याचा प्रयत्न होत आहे. हे अतिशय हास्यास्पद असल्याचे भाजप खासदार अशोक चव्हाण यांनी म्हटले आहे. पक्षश्रेष्ठींना काय तोंड द्यायचे असा प्रश्न काँग्रेसच्या नेत्यांसमोर पडला आहे. नाचता येत नाही आणि अंगण वाकडे अशी काँग्रेसच्या राज्यातील नेत्यांची परिस्थिती झाली आहे. भिवंडीसह मुंबईतील तीन जागा, कोकणातली एक जागा तसेच हिंगोलीची जागा काँग्रेसला मिळाली पाहिजे, अशी माझी सुरुवातीपासूनची भूमिका होती. मात्र आता काँग्रेसच्या नेत्यांना जागावाटपात फार रस नसल्यामुळेच ते आता खापर माझ्यावर फोडत असल्याचा आरोप अशोक चव्हाण यांनी केला आहे. त्यामुळे काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड प्रमाणात नेत्यांविषयी रोष निर्माण झाला असल्याचा दावा अशोक चव्हाण यांनी केला. खापर फोडण्यासाठी सध्या अशोक चव्हाण सोयीचे आहेत, त्यामुळे माझ्यावर खापर फोडले जात असल्याचे म्हणत त्यांनी काँग्रेस नेत्यांचा प्रत्युत्तर दिले आहे.

## अमित शहा यांचा पूर्व विदर्भ दौरा अचानक रद्द

**नागपूर (वृत्तसंस्था):** पूर्व विदर्भात प्रचारासाठी येणारे केंद्रीय गृहमंत्री व भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांचा सहा एप्रिलचा दौरा अचानक रद्द करण्यात आल्याची माहिती आहे. लोकसभेच्या पहिल्या टप्प्यात पूर्व विदर्भातील पाच मतदारसंघात १९ एप्रिलला मतदान आहे. त्यासाठी या भागात अमित शहा प्रचाराला येणार होते. ६ एप्रिलला त्यांची गोंदिया येथे सभा आयोजित करण्यात आली होती. येथे सुनील मेंढे हे भाजपचे विद्यमान खासदार निवडणूक लढवत आहे.

दिल्लीहून नागपूरला येऊन शहा हेलिकॉप्टरने ते गोंदियाला जाणार होते. सभेची तयारी पूर्ण झाली होती. पण ऐनवेळी ही सभा रद्द झाल्याची माहिती आहे. दौरा रद्द होण्याचे कारण मात्र कळू शकले नाही. मात्र प्रकृतीच्या कारणावरून



शहा यांनी दौरा रद्द केल्याचे सांगण्यात येते. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सुद्धा या भागात प्रचारासाठी येणार आहे. त्यांची ८ एप्रिलला चंद्रपूर येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. त्यानंतर ते नागपूर जिल्ह्यातील रामटेक लोकसभा मतदारसंघात सभा घेणार आहे. पूर्वी यासाठी १० एप्रिल ही तारीख निश्चित करण्यात आली होती. पण आता मोदी १४ एप्रिलला येणार असल्याची माहिती आहे. पूर्व विदर्भातील पाचही जागा महायुतीने प्रतिष्ठेच्या केल्या आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने पाच पैकी तीन तर शिवसेना व काँग्रेसने प्रत्येकी एक जागा जिंकली होती. चंद्रपूर येथून भाजपचे ज्येष्ठ मंत्री सुधीर मुनगंटीवार विरुद्ध काँग्रेसच्या प्रतिभा धानोरकर अशी लढत आहे. दरम्यान काँग्रेस नेते राहुल गांधी व प्रियंका गांधीही पूर्व विदर्भाच्या दौऱ्यावर येणार असून त्यासाठी काँग्रेसने जय्यत तयारी सुरू केली आहे.

## वंचितला काँग्रेसच्या कोट्यातून दोन जागा वाढवून देण्याचा प्रस्ताव;प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची माहिती

**चंद्रपूर (वृत्तसंस्था):** वंचित बहुजन आघाडीचे नेते ड.प्रकाश आंबेडकर सातत्याने माझा अपमान करित असले तरी संविधान वाचविण्यासाठी व मतविभाजन टाळण्यासाठी दोन जागा वाढवून देण्याचा प्रस्ताव दिला आहे. मात्र या प्रस्तावावर ड.आंबेडकर यांच्याकडून अजूनही उत्तर आलेले नाही अशी माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी येथे दिली. इंडिया आघाडी व महाविकास आघाडीच्या उमेदवार आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या प्रचारार्थ प्रदेशाध्यक्ष नाना पटोले येथे आले असता पत्रकारांशी बोलतांना ही माहिती दिली.



आम्हाला मतविभाजन नको आहे. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान वाचविण्याची आज गरज आहे. त्यामुळेच आम्ही वारंवार ड.प्रकाश आंबेडकर यांच्याकडे प्रस्ताव देत आहे. मात्र ड.आंबेडकर यांच्याकडून सकारात्मक उत्तर मिळत नसल्याचेही पटोले म्हणाले. अकोलाचे काँग्रेसचे उमेदवार डॉ.अभय पाटील यांनी नामनिर्देशनपत्र दाखल केले. तेव्हा मी अकोला येथे उपस्थित होतो. तेव्हाही आम्ही ड.आंबेडकर यांना प्रस्ताव दिला. त्यानंतर अमरावती येथे काँग्रेस उमेदवाराने नामनिर्देशन दाखल केले तेव्हाही तिथे असतांना वंचितला प्रस्ताव दिलेला आहे.

वंचितच्या नेत्यांकडून वारंवार अपमान होत असतांनाही आम्ही वंचितला सोबत घेण्यास तयार आहे. त्याला कारण आम्हाला मतविभाजन नको आहे तसेच देशाचे संविधान वाचविणे हा प्रमुख उद्देश आहे. ड. प्रकाश आंबेडकर यांना माझी विनंती आहे, अजूनही वेळ गेली नाही, तुम्ही प्रस्ताव द्या, काँग्रेसच्या कोट्यातून दोन जागा वाढवून देवू. मात्र अजूनही वंचितने उत्तर दिले नसल्याची माहिती पटोले यांनी दिली.

## भंडाऱ्याचा पारा ४३ अंशावर,एप्रिल महिन्यात प्रथमच एवढे तापमान

**भंडारा (वृत्तसंस्था):** जिल्ह्यात यावर्षी एप्रिल महिन्यापासूनच सूर्य आग ओकू लागला आहे. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाच तापमानाने ४० ची सीमा ओलांडली असून आज ५ एप्रिल रोजी तापमान ४३ अंश सेल्सिअसच्यावर नोंद झाली आहे. हे तापमान आणखीन वाढणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. त्यामुळे उष्माघातापासून बचावासाठी नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने केले आहे.

सध्या राज्यात उष्णतेची लाट पसरली असून भंडारा जिल्ह्यात एप्रिल महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात पारा ४३ अंशावर पोहोचला आहे. मागील पाच वर्षात पहिल्यांदाच एप्रिल महिन्यात तापमानाचा पारा एवढा चढला आहे. भंडारा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणने दिलेल्या माहितीनुसार, २७ मे २०१९ मध्ये सर्वाधिक ४६ अंश तापमानाची नोंद करण्यात आली होती. सन २०२० आणि २०२२ मध्ये मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात कमाल तापमान ४५ अंश सेल्सिअसवर पोहचले होते तर २०२१ आणि २०२३ मध्ये मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात सर्वाधिक ४४ अंश सेल्सिअस तापमान एवढी नोंद घेण्यात आली होती. त्यामुळे यंदा एप्रिल महिन्यात चढलेला तापमानाचा पारा जिल्हावासियांसाठी तापदायक ठरणार आहे

यवतमाळ जिल्ह्याला अवकाळीचा तडाखा, सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस; पिकांचे नुकसान

हेही वाचानाना पाटोलेंना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होण्याची संधी, कोण म्हणाले असे वाचा सविस्तरसकाळी ७ वाजल्यापासूनच उन्हाच्या झळा जाणवू लागत आहेत. सकाळी ११ वाजल्यापासूनच रस्त्यांवर कर्फ्यूसारखे वातावरण दिसत आहे. या उकाड्यामुळे मात्र सर्वांच्या जीव कासावीस झाला आहे. त्यात दिवसभरात अनेकदा होत असलेल्या भार नियमनामुळे नागरिकांचा जीव मेटकुटीस आला आहे. कधी या उकाड्यापासून सुटका केव्हा मिळते, याची सर्वच वाट बघत आहेत. मात्र अजून दोन महिने बाकी असल्याने नागरिकांच्या चिंतेत भर पडली आहे. उन्हापासून संरक्षणासाठी लोकांची आईसक्रीम, लिंबुपाणी, ज्युस अशा शीतपेयांच्या गाड्यांवर गर्दी वाढली आहे.निसर्गाने उन्हाळा, हिवाळा



व पावसाळा असे तीन ऋतूंचे चक्र बांधून दिले आहे. मात्र वाढते सिमेंटचे जंगल आणि वृक्षांचे कमी होत चाललेले प्रमाण हे तापमान वाढीस कारणीभूत ठरत आहे. ऋतूचक्र व निसर्गावर सुध्दा याचा परिणाम होत आहे. पावसाळ्यात पाऊस पडत नाही. उन्हाळ्यात रविराज सीमा तोडून आग ओकू लागले आहे. पर्यावरणाशी माणूस जो खेळ खेळत आहे त्याची प्रतीपूर्ती निसर्गाकडून केली जात आहे. उन्हाळ्यात कधी मे महिना तापत असताना आता मात्र मार्च महिन्यापासून सूर्यदेव आग ओकत आहेत. यंदाचीच स्थिती बघितल्यास एप्रिल महिन्यानेच सर्वांना होरपळून काढले आहे. एप्रिलच्या पहिल्याच आठवड्यात जिल्ह्याचे तापमान ४३ अंश सेल्सिअसच्या घरात गेले आहे. यावरून मे महिन्यात पडणारी उन्ह आता त्यापूर्वीच पडू लागल्याचे आहे. विशेष म्हणजे, सध्यातरी ४३ अंश सेल्सिअस सर्वाधिक तापमान असले तरी एप्रिलचे तीन आठवडे, मे आणि जून महिना शिल्लक आहे. त्यामुळे मे आणि जून महिन्यात तापमानात वाढ होणार असल्याची शक्यता नाकारता येत नाही असे निर्देश हवामान खात्याने दर्शविले आहे.सध्या जिल्ह्यात तीव्र उष्ण लहरी प्रवाहित होत असल्याने उष्माघाताचा धोका नाकारता येत नाही त्यामुळे नागरिकांनी उष्माघातापासून बचाव करण्याचे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी अभिषेक नामदास यांनी केले आहे. उपाययोजना म्हणून दुपारी १२ ते ४ वाजता दरम्यान उन्हात निघणे टाळावे, उन्हात निघत असताना डोके, कान, नाक कापडाने झाकूनच बाहेर निघावे, चहा, कॉफी व कॅफीनयुक्त शितपेय घेणे टाळावे, मुबलक प्रमाणात पाणी प्यावे, तब्येत अस्वस्थ वाटल्यास तात्काळ वैद्यकीय सल्ला घ्यावा, उष्माघातग्रस्त व्यक्ती आढळल्यास तात्काळ १०८ वर संपर्क करावा असे आवाहन अभिषेक नामदास यांनी केले आहे.

## 'त्या' अनोळखी इसमाची ओळख अजूनही गुलदस्त्यात

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

तळोधी पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या ओवाळा फाट्यावर अपघात स्थितीत तळोधी पोलिसांना दि.२६ नोव्हेंबर २०२३ रोजी आढळलेल्या व नंतर नागपूर मेडिकल कॉलेज येथे उपचारादरम्यान मरण पावलेल्या इसमाची अजूनही ओळख पटली नसल्याने पोलिसांना अडचण निर्माण झाली आहे.

नागभीड तालुक्यातील ओवाळा गावच्या फाट्यावर एक अनोळखी वेड्सर इसम अपघात स्थितीत पडला असताना तळोधी पोलिसांनी त्याला उपचारार्थ नागभीड ग्रामीण रुग्णालय व नंतर चंद्रपूर जिल्हा रुग्णालयात भरती केल्याची घटना २६ नोव्हेंबर २३ रोजी घडली होती.दरम्यान नंतर त्या इसमास नागपूर मेडिकल कॉलेज मध्ये भरती करण्यात आले होते.मात्र उपचारादरम्यान त्या इसमाचा ३० नोव्हेंबर २३ रोजी मृत्यू झाला.आणि पोलिसांनी पोलीस स्टेशन अजनी नागपूर शहर येथे मर्ग दाखल केला. आणि मर्गचे सर्व कागदपत्रे पोस्टाने तळोधी पोलीस स्टेशनला २५ जानेवारी रोजी प्राप्त झाले आहे. दरम्यान सदर इसमाची अजूनही



ओळख पटली नाही.सदर इसमाचे वय अंदाजन ६५ वर्ष असे आहे.उंची ५ फूट ६ इंच असून रंग सावळा आहे. बांधा सडपातळ व चेहरा गोल आहे. डोक्याच्या पुढील भागात टक्कल पडलेला असून केस काळे,पांढरे आहेत.काहीसी वाढलेली दाढी -मिशी सुद्धा काळी पांढरी आहे.तर अंगात काळ्या रंगाची जर्सी व जर्शीच्या आतमध्ये फिक्कट पांढरट रंगाची टी शर्ट व निळ्या रंगाचा जीन्स घातलेला आहे.असे सदर मृतक अनोळखी व्यक्तीचे वर्णन असून या इसमाची ओळख पटल्यास तळोधी पोलीस स्टेशन येथे कळवावे.असे आवाहन तळोधी पोलिसांनी केले आहे.

## राजपूत समाजाचे सुधीर मुनगंटीवार यांना भक्कम पाठबळ

### २० हजारावर बंधु-भगिनींनी दिला जाहीर पाठिंबा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सर्वसमावेश आणि चौफेर विकासाची मशाल घेऊन निघालेले राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघाचे भाजपा, राष्ट्रवादी आणि शिवसेना, मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार ना.सुधीर मुनगंटीवार यांना चंद्रपूरच्या राजपूत समाजाने समर्थन जाहीर केले आहे. चंद्रपूर व देशाच्या विकासाच्या संकल्पात आपले योगदान देण्यासाठी मतदारसंघातील २० हजार राजपूत बंधू-भगिनी ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहतील, असा निर्धार राजपूत समाजाचे अध्यक्ष करणसिंह बैस, सचिव शुभमसिंग जनवार, कोषाध्यक्ष शशांक बैस, सहसचिव कलश बैस, उपाध्यक्ष अंकित चव्हाण, चंद्रपुर व्यापारी मंडलचे अध्यक्ष रामजीवन



सिंग परमार,चेतनसिंह गौर,अमरसिंग राठोड, दशरथससिंह ठाकूर, अभयसिंग कछवां, अॅड. राजेश ठाकूर, जयसिंग गहेरवार, राजेंद्र सिंग बैस, राजेंद सिंग राठोड, संदीप बैस, विशाल गहेरवार, करणसिंग गहेरवार, संजयसिंग बैस, सुनील बैस, कुलविरसिंग राजपूत, प्रतापसिंग बैस, नलेश चव्हाण, हेमंत तोमर, अमित बैस, पंकज दिक्षित, राज चंदेल, चेतन बैस, श्रेयांश ठाकूर, संदेश बैस, रणवीर गौतम, वैभवसिंग, जय ठाकूर, आशिष ठाकूर, पियूष ठाकूर, बंटी ठाकूर, विक्रम राठोड,अथर्व चौहान, शीला चौहाण, प्रतिमा ठाकूर, श्रुती ठाकूर, रुची कछवाह, दीपिका गहेरवार यांनी केला आहे.

# विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच विद्यापीठाचे ध्येय

## विद्यार्थी विकास विभागाच्या विद्यार्थीभिमुख योजना व उपक्रम

**नक्षलग्रस्त, ग्रामीण व आदिवासी बहुल भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनाने गोंडवाना विद्यापीठाची २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापना केली. स्थापनेपासूनच अध्ययन, अध्यापक आणि संशोधन या तीनही क्षेत्रामध्ये विद्यापीठ नवनवीन संकल्पनांची व उपक्रमांची प्रत्यक्षात अमंलबजावणी करीत आहे. आदिवासी बहुल, नक्षलग्रस्त व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या माध्यमातून विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील असून विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच विद्यापीठाचे ध्येय आहे.**

गोंडवाना विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच विद्यार्थी विकास विभाग कार्यान्वीत आहे. विद्यापीठाच्या महत्वपुर्ण अशा समाजनिष्ठा, राष्ट्रीय एकात्मता, शीलसंवर्धन, समता, समाजसेवा या उद्दीष्टपुर्तीच्या बाबतीत प्रचलीत शिक्षण पद्धतीद्वारा शैक्षणिक उपक्रमाबरोबरच शिक्षणेत्तर उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगींण विकास करता यावा या उदात्त हेतूने विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाद्वारा विविध उपक्रमाचे आयोजन तसेच विद्यार्थी हितार्थ व कल्याणार्थ योजना राबविल्या जातात.

विद्यापीठाशी संलग्न असलेली महाविद्यालये आणि विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या संस्कारक्षम व कल्याणकारी योजना राबविणे तसेच आवश्यकतेनुसार नवीन योजना तयार करणे व त्यांची अंमलबजावणी करणे यासाठी विद्यार्थी विकास विभाग कार्य करीत आहे.

**विद्यार्थी विकास विभागाच्या कामकाजाची वैशिष्टये:**

विद्यार्थ्यांसाठी कल्याणकारी उपक्रमाचे विद्यापीठ तसेच महाविद्यालय स्तरावर आयोजन करणे. विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या आंतरविद्यापीठ स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी संधी उपलब्ध करुन देणे. याकरीता आंतर महाविद्यालयीन व गरज भासल्यास विभागीय स्तरावर सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करणे. राष्ट्रहिताच्या दृष्टीने महत्त्वाचे उपक्रम संलग्नीत महाविद्यालयांमध्ये राबविण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे व महाविद्यालयांना सहकार्य करणे. विद्यार्थ्यांचा सामाजिक, सांस्कृतिक व वांग्मयीन व्यासंग वाढविण्याकरीता प्रयत्न करणे. केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती महाविद्यालयांना देणे व मार्गदर्शन करणे. विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नियमानुसार विविध निधीमधून आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे, हि विद्यार्थी विकास विभागाच्या कामकाजाची वैशिष्टये आहेत.



श्री.सुधीर आत्राम
जनसंपर्क अधिकारी
गोंडवाना
विद्यापीठ,गडचिरोली

महाविद्यालय स्तरावर विद्यार्थी कल्याणार्थ योजना कार्यान्वित करण्यासाठी, कार्यक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शक विद्यापीठ कायद्यानुसार, विद्यार्थी विकास मंडळाची रचना केलेली असते. सदर मंडळ महाविद्यालयामध्ये वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे वेळापत्रक ठरवून कार्यक्रमांचे नियोजन व आयोजन सुव्यवस्थितपणे होत आहे किंवा नाही यावर लक्ष केंद्रित करून मार्गदर्शक सूचना देखील करीत असते.

विद्यार्थी विकास मंडळाने घेतलेल्या निर्णयांच्या प्रभावी अंमलबजावणी करिता महाविद्यालय एका कर्तव्यदक्ष सहाय्यक तथा सहयोगी प्राध्यापकांची विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून नियुक्ती करीत असते. सदर विद्यार्थी विकास अधिकारी, विद्यार्थी कल्याणार्थ उपक्रम राबविणे, विद्यार्थी परिषद व विद्यार्थी हिताच्या दृष्टीने संबंधित कार्य सांभाळणे तसेच दैनंदिन कामकाज पाहण्याकरीता प्राचार्य नामनिर्देशनाने नियुक्ती करीत असतात. विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजना:

**कमवा आणि शिका योजना:**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण संपादन करण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे, मानवी श्रमाची प्रतिष्ठा जोपासणे, स्वयंरोजगाराच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे, ज्ञानसेवक बनविणे, श्रमसंस्कृतीची जाणीव निर्माण करणे आणि विविध प्रकारची कामे करून मिळणाऱ्या अनुभवाचा लाभ विद्यार्थ्यांना मिळवून देणे हे या योजनेची उद्दिष्टे आहे.

**क्रांतिवीर बाबुराव शेडमाके कमवा आणि शिका योजना:**

गोंडवाना विद्यापीठाच्या दशमानोत्सवानिमित्त हि योजना सुरू करण्यात आली आहे. आदिवासींचे परंपरागत ज्ञान व संस्कृतीवर आधारित उपजीविकेचे साधन नवसंकल्पना म्हणून रुजवितांना मिळणाऱ्या कार्यानुभवाचा लाभ विद्यार्थ्यांना सदर योजनेद्वारे मिळवून देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

**व्यक्तिमत्व विकास योजना:**

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकास करणे, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, जीवनमूल्ये रुजविण्याचा प्रयत्न करणे तसेच विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी आरोग्य, कायदे, संस्कृती, संगणक, माहिती तंत्रज्ञान, कौशल्य विकास अशा कार्यक्रमाद्वारे मार्गदर्शन करणे. शिक्षणेत्तर कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे आणि स्वयंरोजगाराच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना प्रेरित करणे हा या योजनेमागचा उद्देश आहे.

**आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजना:**

विद्यार्थ्यांना आपत्तीचे आकलन करून देणे. आपत्ती टाळण्यासाठी विविध स्त्रोतांची माहिती करून देणे. आपत्तींना सामोरे जाण्याची तयारी करून घेणे. आपत्तीनंतर बचाव कार्य, मदतकार्य वेगाने व सूत्रबद्ध पद्धतीने करण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावे, याकरीता तज्ज्ञांद्वारे विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणे. आपत्ती व्यवस्थापनातून सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करणे. आपत्ती येण्यापूर्वी पूर्वतयारीबाबत विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करणे. महाविद्यालयीन स्तरावर आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापित करणे. आपत्ती व्यवस्थापन कायद्याची व नियमांची माहिती विद्यार्थ्यांना करून देणे. विद्यार्थ्यांना आपत्तीप्रसंगी स्वयंसेवक म्हणून स्फूर्तीने सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे तसेच आपत्ती व्यवस्थापनात प्रशासनास योग्य ते सहकार्य करणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

**विद्यार्थी आर्थिक सहायता निधी:**

गरीब, गरजू पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी बस पास सवलत खर्च, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, वस्तीगृहातील राहण्याचा व जेवणाचा खर्च, पुस्तकांचा व इतर शैक्षणिक साहित्याची खरेदी यासाठी व तत्सम इतर शैक्षणिक खर्चासाठी नियमावलीनुसार आर्थिक सहाय्य केल्या जाते. विद्यापीठाद्वारे गरीब विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या इतर योजनांसाठी सदर निधीतून तरतूद करण्यात येते. त्याचप्रमाणे, विद्यार्थी वैद्यकीय सहायता निधीतून वैद्यकीय मदत केली जाते.

**युवक महोत्सव:**

विद्यार्थी विकास विभागाद्वारे सर्व संलग्न महाविद्यालयातील तसेच विद्यापीठ पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांना सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी आंतर महाविद्यालयीन सांस्कृतीक स्पर्धांचे आयोजन करून प्रोत्साहित केले जाते. तसेच विविध सांस्कृतिक कला प्रकारांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ संघामध्ये सहभागी होण्याकरिता पाठविण्यात येते. यातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना चालना मिळण्यास मदत होत आहे.

**महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ / आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव: इंद्रधनुष्य:**

शास्त्रीय गायन, शास्त्रीय वाद्यसंगीत, सुगमसंगीत, पश्चिमात्य गायन, भारतीय व पश्चिमात्य समूहगान, लोकसंगीत वाद्यवृंद, लोक व आदिवासी नृत्य, शास्त्रीय नृत्य, साहित्यिक कलाप्रकारात प्रश्नमंजुषा, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, रंगमंच कलाप्रकारात एकांकिका, मुकनाट्य, नकल आणि ललित कलाप्रकारात स्थळचित्र, पोस्टर मेकिंग, माती कला, व्यंगचित्र, रांगोळी आदी उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत केले जाते.

**आविष्कार संशोधन महोत्सव:**

विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला चालना देण्यासाठी व त्यांच्या संशोधन प्रकल्पाला व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याकरीता आविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. आविष्कारच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती रुजवण्याकरीता विद्यार्थी विकास विभाग प्रयत्नशील आहे.

# लोकसभेची जागा भाजपाकडे दिल्यास निवडून येण्याची शक्यता

**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था**



येथील लोकसभा मतदारसंघातून महा विकास आघाडीतून शिवसेना उबाठा चे उमेदवार माजी खासदार चंद्रकांत खैरे यांना निश्चित झाली पण महायुतीत हि जागा शिंदे गट शिवसेनेची आहे पण यासाठी स्थानिक भारतीय जनता पक्षाचे नेते उमेदवारी मिळविण्यासाठी जंग पछाडत आहे.पण महापौर राहिलेले व केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पदावर विराजमान असलेले खासदार भागवत कराड यांना भाजपाने मंत्री बनवण्याचा डावच लोकसभा मतदारसंघ ताब्यात घेण्याचा होता आणि यामुळे भागवत कराड मंत्री झाल्यापासून कराड यांच्यात जसे ४४० व्होल्ट पावरच आली. यामुळे कराडांनी जीव तोडून जनसंपर्क वाढवला आहे.आणि मोठ्या प्रमाणात भाजपाकडे जनतेचा कौल आहे. पण ही जागा महायुतीत शिवसेना शिंदे गटाकडे असल्यामुळे पालकमंत्री संदीपान भुमरे हे उमेदवारीसाठी इच्छुक आहेत.यामागचे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीचे राजकारण काही ओर आहे.पण छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुका,मुकुंदवाडी पासून फुलंब्री हा भाग जालना लोकसभा मतदारसंघात आहे तर संदीपान भुमरे यांचे सध्या जिवलग मित्र असलेले मंत्री अब्दुल सत्तार यांचा विधानसभा मतदारसंघ सिल्लोड हेही जालना लोकसभा मतदारसंघात आहे यामुळे केवळ पालकमंत्री आधारावर लोकसभा निवडणुक लढवून निवडून येणे शक्य नाही.तसेच गंगापूर,वैजापूर,कन्नड मतदारसंघावर मोठी मदार आहे तर आमदार प्रशांत बंब यांची गंगापूर खुलताबाद मतदारसंघात भाजपची पकड चांगली आहे तर कन्नड मतदारसंघात शिवसेना उबाठाची पकड चांगली आहे. वैजापूर मतदारसंघात शिवसेना शिंदेचे आमदार असले तरी अनेक भागात आमदार बोरणारे यांना मतदारसंघातून मोठा विरोध आहे.छत्रपती संभाजीनगर पश्चिम मतदारसंघात विद्यमान आमदार शिंदे सेनेचे असले तरी यांची काही परिस्थिती काहीशी बोरणारे सारखीच आहे.तर मध्य मतदारसंघातून काही भाजपाचा यावेळी जोर जास्त आहे.तर महा विकास आघाडीला भुमरे यांना उमेदवारी दिली तर गद्दारीच्या मुद्यावर निवडणूक प्रचारात लढण्यासाठी सोपे जाईल.

यामुळे सर्व गणित पाहीले असता महा विकास आघाडीला खरी टक्कर भाजपाच देऊन छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघ ताब्यात ठेवु शकते. पण जर उमेदवारी भागवत कराड यांना दिली तरच छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघ महायुतीच्या ताब्यात राहील.

# माढा लोकसभेसाठी हरिभाऊ पाटील यांना महाविकास आघाडीने उमेदवारी द्यावी

**सांगोला । प्रतिनिधी**

माढा लोक सभा मतदारसंघाच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे नेते हरिभाऊ नारायण पाटील यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी कार्यकर्त्यांमधून होत आहे.



हरिभाऊ पाटील यांना उमेदवारी दिल्यास माढा लोकसभा मतदारसंघांमध्ये धनगर समाजाची मत संख्या लक्षणीय असल्याने मतदारांमध्ये चैतन्य निर्माण होऊन भारत देशातील धनगर समाजाचा पहिला लोकसभा खासदार निवडला जाईल. त्यामुळे देशात नवा इतिहास घडेल. तसेच हरिभाऊ पाटील हे गेली ४० वर्षे समाजकारणाच्या माध्यमातून प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध संघर्ष करीत असून त्यांनी अनेक ज्वलंत प्रश्नांच्या संदर्भाने यशस्वी लढा दिलेला आहे. त्यांची उमेदवारी म्हणजे वंचित भटके विमुक्त बहुजन अल्पसंख्यांक अशा तमाम माढा वासियांची सन्मानाने गौरविलेली उमेदवारी तसेच यापूर्वीचे खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांच्या कार्यपद्धती विषय मतदार संघामध्ये प्रचंड नाराजीचा सूर आहे. अशा परिस्थितीमध्ये लोकांना आपल्या स्वत:मध्ये मिसळणारा व आपल्या हक्काचा आपल्यासाठी रस्त्यावरची लढाई लढणारा खऱ्या अर्थाने जनमानसाचा आवाज होऊ शकतो अशा उमेदवाराची निकड असताना हरिभाऊ पाटील हे समर्थ पर्याय आहेत. महाविकास आघाडीने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन माढा मतदारसंघांमध्ये यश मिळवण्यासाठी हरिभाऊ पाटील यांना महाविकास आघाडीने उमेदवारी द्यावी, असे मत सांगोला तालुका अल्पसंख्यांक कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सादिक

# ही निवडणूक विकसित भारताचा संकल्प पूर्ण करण्याची संधी आहे : पालकमंत्री विखे पाटील

**अहमदनगर** देशात सध्या निवडणुकीचे वातावरण असताना सदरची निवडणूक ही विकसित भारताचा संकल्प पूर्ण करण्याची संधी असून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हे स्वप्न पूर्ण करू शकतात यामुळे या निवडणुकीतुन तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करून ही संकल्पना पूर्ण करायची आहे. असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. ते नगर येथील महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित राष्ट्रवादीच्या जिल्हा कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होते.

नगर दक्षिण मतदार संघातून भाजपच्या वतीने विद्यमान खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांना उमेदवारी दिल्या नंतर महायुतीच्या सर्वच घटक पक्षांनी त्यांच्या प्रचाराची धुरा सांभाळली आहे. यासाठी जिल्ह्यात ठीकठिकाणी विविध मेळाव्यांचे आयोजन केले जात आहे. याच पार्श्वभूमीवर नगर येथील केडगाव येथे राष्ट्रवादीच्या वतीने जिल्हा कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. यावेळी कार्यकत्यांना संबोधित करताना पालमंत्री यांनी महायुती सरकारच्या माध्यमातून जिल्ह्यात झालेल्या विकासकामांचा आढावा घेतला. तसेच येणाऱ्या काळात केल्या जाणाऱ्या विकासकामांची माहिती दिली, तर शरद पवार यांनी महाविकास आघाडीचे सरकार असताना जिल्ह्यासाठी काय केले? असा सवाल सुद्धा विचारला. यामुळे देशाचा आणि जिल्ह्याचा विकास साधायचा असेल तर पंतप्रधान नरेंद्र मोदींशीवाय कोणताही पर्याय नसल्याने ह्या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवाराला ऐतिहासिक मतांनी विजयी करून पुन्हा एकदा देशात मोदी सरकार आणण्याचे आवाहन केले. तर राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी सुद्धा राष्ट्रवादीच्या वतीने सर्व जिल्ह्यातील नेते पदाधिकारी आणि कार्यकर्ते सुजय विखे पाटील यांचा ऐतिहासिक विजय मिळवून देण्यास मोठे योगदान देतील असे आश्वासन दिले. तर आमदार संग्राम जगताप यांनी डॉ. सुजय विखे पाटील यांनी मागील पाच वर्षात केलेल्या कामांचा पाढा वाचत नगर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सुजय विखे यांना निवडून आणण्याची जबादारी आपली असल्याचे सांगितले. तर सुजय विखे पाटील यांनी सदरची निवडून ही देशासाठी, आपल्या उज्वल भवितव्यासाठी असून मतदान करताना याचा आपण विचार करावा असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी आमदार संग्राम जगताप, राष्ट्रवादी युवक कॉँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश युवक अध्यक्ष सुरज चव्हाण, उपाध्यक्ष नितेश नाहाटा, माजी आमदार चंद्रशेखर घुले, जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी बाळासाहेब नाहाटा, राष्ट्रवादी महिला अध्यक्षा अनुराधा नागवडे, चेअरमन सहकारी जिल्हा बँक, राजेंद्र नागवडे, यांच्यासह अहिल्यानगर आणि विविध तालुक्यातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



# निवडणूक प्रक्रियेमध्ये अतिशय चांगले काम करा

## जिल्हाधिकाऱ्यांकडून विविध यंत्रणेच्या तयारीचा आढावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक १९ एप्रिल २०२४ रोजी होत आहे. आता आपल्याकडे केवळ दोन आठवड्यांचा कालावधी शिल्लक आहे. भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार जिल्ह्यात आतापर्यंत सर्व यंत्रणेकडून समाधानकारक काम झाले असले तरी यापुढे आणखी चांगले काम करा, अशा सुचना जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिल्या

नियोजन सभागृह येथे निवडणुकीशी संबंधित सर्व यंत्रणा तसेच नोडल अधिका-यांच्या तयारीचा आढावा घेतांना ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, सहायक जिल्हाधिकारी (केळापूर, जि. यवतमाळ) सुहास गाडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी, उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, मनपा आयुक्त विपीन पालीवाल तसेच सर्व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व नोडल अधिकारी उपस्थित होते.

१६ मार्च रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा झाली, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, चंद्रपूर लोकसभा मतदारसंघासाठी पहिल्याच टप्प्यात म्हणजे १९ एप्रिल २०२४ रोजी निवडणूक होणार आहे. उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र, त्याची छाननी, अंतिम उमेदवार यादी, चिन्हांचे वाटप हे टप्पे प्रशासनाकडून अतिशय चांगल्या पध्दतीने पार पडले. निवडणूक प्रक्रियेचा अर्धा कालावधी संपला असून आता प्रत्यक्ष मतदानापर्यंत आपल्याकडे तयारीसाठी केवळ दोन आठवडे शिल्लक आहेत. याकाळात निवडणुकीच्यादृष्टीने प्रत्येकाला नेमून देण्यात आलेले काम अतिशय चांगले करा. यात कोणतीही चूक होऊ देऊ नका.

जिल्ह्यासाठी पोस्टल बॅलेट, गृहमतदानाकरीता लागणारे साहित्य व निवडणुकीच्या दृष्टीने इतर आवश्यक बाबी प्रत्येक विधानसभा मतदासंघात उपलब्ध झाले असून अधिकारी आणि कर्मचा-यांचे मनुष्यबळसुध्दा रँडमायझेशन प्रक्रियेद्वारे निश्चित करण्यात आले आहे. आता संबंधितांचे प्रशिक्षण घेऊन त्यांना निवडणूक प्रक्रियेची संपूर्ण माहिती देणे, ईव्हीएम स्ट्राँग रुमची सुरक्षा व्यवस्था, त्याचा सुरक्षा आराखडा आदी बाबी काळजीपूर्वक तपासून घ्यावा. तसेच मतदान झाल्यानंतर जिल्हास्तरावर एकत्रित गोळा होणा-या ईव्हीएम- व्हीव्हीपॅटसाठी तयार करण्यात आलेल्या स्ट्राँगरुमला प्रत्येक सहायक निवडणूक अधिका-यांनी प्रत्यक्ष भेट द्यावी. आपापल्या मतदारसंघातून स्ट्राँग रुमपर्यंत पोहचण्याचा मार्ग, वाहतूक व्यवस्था, गाड्यांची उपलब्धता, पोलिस बंदोबस्त आदी बाबींचे आताच नियोजन करावे, अशाही सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.यावेळी जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी इलेक्टोल रोल, पोस्टल बॅलेट, रँडमायझेशन प्रक्रिया, ईव्हीएम स्ट्राँग रुम व्यवस्था, मतदार माहिती चिठ्ठी वाटपाचे नियोजन, नियंत्रण कक्ष उभारणी, मतदान केंद्रावरील सुविधा, आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी, खर्च आढावा, एफएसटी, व्हीव्हीटी, व्हीएसटी या टीमकडून करण्यात येणारी कारवाई आदींचा आढावा घेतला.



## १७-परभणी लोकसभा मतदार संघा साठी ५ उमेदवारांचे ७ अर्ज दाखल





**परभणी । प्रतिनिधी**

आजपर्यंत ८५ उमेदवारांना ११४ नामनिर्देशन अर्जाचे वितरण परभणी लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने १७-परभणी लोकसभा मतदार संघ निवडणुकीसाठी आज ५ उमेदवारांनी ७ नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहेत. आजपर्यंत एकुण ९ उमेदवारांचे १८ नामनिर्देशन अर्ज स्विकारण्यात आले आहे. तर आज २४ उमेदवारांना २७ नामनिर्देशन अर्जांचे वितरण करण्यात आले आहे. आतापर्यंत एकूण ८५ इच्छुक उमेदवारांना ११४ नामनिर्देशन अर्जाचे वितरण करण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी रघूनाथ गावडे यांनी दिली आहे.

१७-परभणी लोकसभा मतदार संघासाठी आज दि. ०२ एप्रिल रोजी जानकर महादेव जगन्नाथ (राष्ट्रीय समाज पक्ष), बोबडे सखाराम ग्यानबा (अपक्ष), मुस्तफा मैनोदीन शेख (अपक्ष), राजन रामचंद्र क्षीरसागर (कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया) यांनी प्रत्येकी एक नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहे. तर जाधव संजय (बंडू) हरिभाऊ (शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे)) यांनी तीन नामनिर्देशन अर्ज दाखल केले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी रघुनाथ गावडे यांनी दिली.

यावेळी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी रघुनाथ गावडे, अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी दत्तु शेवाळे यांनी उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र दाखल करुन घेतले. उमेदवारांना गुरुवार, दि.४ एप्रिलपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते ३ यावेळेत आपले नामनिर्देशन पत्र सादर करता येणार आहे. शुक्रवार, दि. ५ एप्रिल रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येणार असून, सोमवार, दि. ८ एप्रिल, २०२४ पर्यंत उमेदवारांना आपले अर्ज मागे घेता येणार आहे. तर शुक्रवार, दि. २६ एप्रिल रोजी १७-परभणी लोकसभा मतदार संघासाठी मतदान होणार आहे. या निवडणूकीचा निकाल मंगळवार दि. ४ जून रोजी लागणार आहे.

## निवडणूक प्रक्रियेदरम्यान माहिती करीता विविध प उपलब्ध

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने ७१-चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात आदर्शआचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या निवडणूक कालावधीत जर आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार, नागरिकांना आता निवडणूक आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. त्यासाठी भारत निवडणूक आयोगाने C-Vigil -pp (सतर्कता मोबाईल प ) विकसित केले असून यावर तक्रार करण्यास हे प मोबाईलमध्ये डाऊनलोड करणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे मतदानाची टक्केवारी पाहण्याकरिता Voter Turn Out app, मतदारांच्या मदतीकरिता Voter help link d Saksham -pp., मतदारांना आपल्या उमेदवारांची संपूर्ण माहिती मिळण्याकरिता Know Your Candidate -pp तसेच मतदारांसंबंधी माहितीकरिता Voter portal -pp तयार करण्यात आले आहे. १३-चंद्रपूर लोकसभा मतदारसंघ ( ७१ चंद्रपूर विधानसभा मतदारसंघ क्षेत्र ) अंतर्गत मतदारांनी मा.निवडणूक आयोग यांनी तयार केलेल्या या विविध प्रणालींचा वापर करण्यास हे प मोबाईलमध्ये डाऊनलोड करण्याचे आवाहन सहायक निवडणुक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संजय पवार यांनी केले आहे.



सी-व्हीजील पचा वापर कसा करावा : अँड्रॉईड मोबाईलमधील गुगल प्ले स्टोअर आणि आयफोनमधील प स्टोअर या पमध्ये जाऊन सीव्हिजिल (cVIGIL) सर्च करा. त्यानंतर प डाऊनलोड करा. त्यानंतर प उघडून मोबाईल क्रमांक, पत्ता, मतदारसंघ समाविष्ट करून खाते तयार करा. तुम्हाला ज्या उल्लंघनाची तक्रार करायची आहे ते निवडा आणि स्थळ, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडीओसह घटनेचे तपशील टाका. त्यानंतर तक्रार सबमिट करा, असे कळविण्यात आले आहे.

## वंचितने परभणीत जाहीर केलेला उमेदवार बदलला

**परभणी**–लोकसभा निवडणुकीमुळे राज्यात सद्या अतिशय वेगवान घडामोडी होत आहेत. शिंदेंसेनेवर जाहीर उमेदवारी बदल्याची नामुष्की आली. त्यासाठी नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली. त्यातच आता प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीच्या वतीने देखील परभणीत अचानक उमेदवार बदलण्यात आला आहे. वंचितने परभणी लोकसभा मतदारसंघात आपला जाहीर झालेल्या उमेदवारास रद्द करून त्या ठिकाणी हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांची उमेदवारी जाहीर केली असून त्यांनी उमेदवारी अर्ज देखील सादर केला आहे.यापूर्वी वंचितने परभणीतून बाबासाहेब उगले यांना उमेदवारी जाहीर केली होती. मात्र, आता त्यांच्याजागी हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांना उमेदवारी देण्यात आली आहे. पंजाबराव डख यांनी गुरुवारी परभणीतून वंचितचे उमेदवार म्हणून आपला उमेदवारी अर्ज भरला. परभणीत महाविकास आघाडीकडून संजय उर्फ बंडू जाधव आणि महायुतीकडून महादेव जानकर हे रिंगणात आहेत. आता पंजाबराव डख या निवडणुकीत त्यांच्यासमोर कितपत आव्हान निर्माण करू शकतात, हे येत्या काळात समोर येईलच.वंचित बहुजन आघाडीकडून आतापर्यंत १९ लोकसभा मतदारसंघांमध्ये उमेदवारी जाहीर केले आहेत. त्यापैकी तीन उमेदवार वंचितकडून बदलण्यात आले आहेत. रामटेकमध्ये वंचितकडून यापूर्वी शंकर चहांदे यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, तांत्रिक कारणामुळे माघार घेत असल्याचे सांगत शंकर चहांदे यांनी काँग्रेसचे अपक्ष बंडखोर उमेदवार किशोर गजभिये यांना पाठिंबा जाहीर केला होता. तर यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघात वंचितने पूर्वी सुभाष पवार यांना रिंगणात उतरवले होते. मात्र, त्यानंतर वंचितने अचानक निर्णय बदलत अभिजित राठोड या तरुण चेहऱ्याला संधी देण्याचा निर्णय घेतला होता.

## शेकडो मुस्लिम तरुणांना नोकरी देत मुस्लिम समाजाला न्याय दिला–मा.मंत्री हर्षवर्धन पाटील

**इंदापूर**–इंदापूर तालुक्यामध्ये गेली ७५ वर्षांपासून हिंदू-मुस्लीम समाज एकोप्याने व बंधुभावाने राहत असून, पिढ्यान-पिढ्या एकमेकांना सुख दुखात साथ देत आहे. इंदापूर तालुक्यातील हिंदू-मुस्लीम एकोपा हा राज्यामध्ये आदर्श आहे. असे गौरोद्गार राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी जंक्शन ता. इंदापूर येथे काढले.

जंक्शन येथे नंदिकेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज येथे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या उपस्थितीमध्ये इफ्तार पार्टी उत्साही वातावरणात संपन्न झाली.या इफ्तार पार्टीचे आयोजन कर्मयोगी शंकररावजी पाटील कारखान्याचे संचालक वसंतराव मोहोळकर,कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती रोहित मोहोळकर व मोहोळकर कुटुंबियांनी केले होते. सदर प्रसंगी हर्षवर्धन पाटील बोलत होते.ते पुढे म्हणाले, इंदापूर तालुक्यात सन १९५२ पासून कर्मयोगी शंकररावजी पाटील, राजेंद्रकुमार घोलप, मोहोळकर गुरुजी यांनी सर्व जाती-धर्मांना बरोबर घेऊन राजकारण, समाजकारण करण्याची शिकवण आंम्हा कार्यकर्त्यांना दिली आहे.त्या शिकवणीनुसार सर्व समाजाला बरोबर घेऊन जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन आपण राजकारण समाजकारण करीत आहोत. कुठलाही धर्म हा प्रथम मानवतेची शिकवण देतो,असे हर्षवर्धन पाटील यांनी स्पष्ट केले.महंमद पैगंबर यांनी इतरांना मदत करा,अशी माणुसकीची शिकवण दिली आहे. कुराण मध्ये सेवा करण्यास महत्त्व दिले आहे.रोजा चा शारीरिक क्षमता सुधारण्यास मदत व्हावी,असा हेतू आहे. सर्वधर्मियांची एकजूट ही समाजाच्या प्रगतीसाठी महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन हर्षवर्धन पाटील यांनी केले.

मुस्लिम धर्मात रमजान महिन्याचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. या काळात अल्लाहकडे घातलेल्या साकड्याचे फळ प्रत्येकाला चांगले मिळते.अल्लाह आपणा सर्वांना निरोगी आरोग्य देवो अशी सदिच्छा व्यक्त करीत,सर्व मुस्लिम बांधवांना रमजान ईदनिमित्त हर्षवर्धन पाटील यांनी याप्रसंगी शुभेच्छा दिल्या.या इफ्तार पार्टीचे उत्कृष्ट आयोजन केलेबद्दल वसंतआबा मोहोळकर,रोहित मोहोळकर व मोहोळकर कुटुंबियांचे हर्षवर्धन पाटील यांनी आभार व्यक्त केले. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती रोहित मोहोळकर,अजितभाई मुलाणी, बबलू पठाण यांची भाषणे झाली.यावेळी इंदापूर तालुका भाजपचे अध्यक्ष अँड.शरद जामदार, वसंतराव मोहोळकर,प्रदीप पाटील,राजेंद्र गायकवाड,सत्यशील पाटील,अंकुश रणमोडे,उद्धव माने,विजय मचाले,महेश खराडे,दादाभाई मुलाणी, समसूद्दीन मुलाणी,समीरभाई मुलाणी,रसूलभाई पठाण,दत्तात्रय साळुंखे,सुधाकर कणसे,विलास पवार,ऋषिकेश मोहोळकर,नाना गोसावी,श्रीकांत मोहोळकर,सतीश भोसले,इंन्नूसभाई व मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## ११ व १२ एप्रिल रोजी मतदान यंत्र तयार करण्याची प्रक्रिया उमेदवारांना किंवा प्रतिनिधींना उपस्थित राहण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

निवडणुकीकरिता मतदान यंत्र तयार करण्यास ( Commissioning of EVM² ) ११ व १२ एप्रिल २०२४ या दोन तारखा निश्चित करण्यात आल्या असून या प्रक्रियेदरम्यान निवडणुकीत उभे असलेले उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी तहसील कार्यालय, चंद्रपूर येथे उपस्थित राहावे, असे आवाहन सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा चंद्रपूरचे उपविभागीय अधिकारी संजय पवार यांनी केले आहे.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी १३-चंद्रपूर लोकसभा क्षेत्र अंतर्गत १९ एप्रिल रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्याकरिता निवडणूक विभागामार्फत विविध कार्ये केली जात आहेत. यात निवडणूक कर्तव्यावर नियुक्त केलेल्या अधिकारी व कर्मचा-यांकरीता टपाली मतपत्रिका व एऊउ उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्याकरिता सुविधा केंद्र ७ व ८ एप्रिल रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत बी.जे.एम. कार्मेल अकॅडमी,



ऊजउ रोड, जैन मंदीर जवळ, तुकुम चंद्रपुर येथे ठेवण्यात येणार आहे. तसेच दिनांक ०९, १० व ११ एप्रिल रोजी ८५ वर्ष वा त्यावरील वयाचे मतदार तसेच दिव्यांग मतदार ज्यांनी नमुना १२ (ड) मध्ये मागणी नोंदविलेली आहे, त्यांच्या मतदानाकरीता नेमून दिलेले पथक सकाळी १० ते सायंकाळी ५ च्या दरम्यान घरोघरी फिरून मतदान नोंदवून घेणार आहेत.


७१- चंद्रपूर विधानसभा मतदान संघात ३७९ मूळ मतदान केंद्र व ४ सहकारी मतदान केंद्र असे एकुण ३८३ मतदान केंद्र आहेत. या विधानसभा क्षेत्रातील सर्व मतदारांना मतदान स्लिपचे वाटप ब्लॉक लेव्हल अधिका-यांमार्फत ५ ते १२ एप्रिल पर्यंत करण्यात येणार आहे. या विधानसभा क्षेत्रात ५ स्थीर निगराणी स्थळे ठेवण्यात आली असून त्यांचे मार्फत २४ बाय ७ वाहनाची कसून तपासणी करण्यात आली आहे. मतदान केंद्रावर मतदान यंत्रे पोहचविणे व परत आणणाऱ्या प्रत्येक वाहनावर जीपीएस यंत्रणा लावण्यात येणार आहे. मतदान झाल्यानंतर मतदान केंद्रावरून मतदान यंत्र परत १३-चंद्रपूर लोकसभा मतदार संघाकरीता असलेल्या सुरक्षा कक्षात ठेवण्यात येईल.

उमेदवारांच्या खर्चावर देखरेख करण्याकरिता व्हीडीओ निगरानी पथक (तळवशे डींीशळश्रश्ररपलश ढशरा) व सहायक खर्च निरीक्षक यांच्या नेमणुका करण्यात आलेल्या आहेत. ७१- चंद्रपूर विधानसभा क्षेत्रात एकूण १९२ मतदान केंद्रावर बेव कास्टींग करण्यात येणार असून C-Vigil -pp (सतर्कता मोबाईल प ) कार्यान्वीत केले आहे.आदर्श आचारसंहिता भंग झाल्याबाबत तक्रार असल्यास सदर App वर नागरिक तक्रार करू शकत असल्याचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांच्याद्वारे कळविण्यात आले आहे.

## कौशल्य प्रशिक्षणातून उघडले स्वयंरोजगाराचे नवे दालन

# गोंडवाना विद्यापीठाच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांना कौशल्य व तांत्रिक ज्ञानाचे धडे









**गडचिरोली । प्रतिनिधी**

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात औद्योगिकीकरणावर भर देत कुशल व्यावसायिकांची मागणी वाढत आहे. ही मागणी पूर्ण करण्यासाठी कौशल्यावर आधारित शिक्षणाची अत्यंत गरज आहे. विद्यार्थी त्यांच्या शैक्षणिक आणि पदवीधर कार्यक्रमादरम्यान ज्ञान मिळवत असतांना, खरे आव्हान रोजगारक्षम कौशल्यांच्या अभावामध्ये आहे. उत्पादकता वाढविण्यासाठी विविध क्षेत्रांना विशिष्ट कौशल्ये आवश्यक असतात. त्यामुळे कौशल्य-आधारित, व्यावसायिक प्रशिक्षण तरुणांना रोजगारक्षम बनवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरते. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून येथील तरुण-तरुणींसाठी स्वयंरोजगाराचे नवे दालन उघडले आहे.

कौशल्य-आधारित, व्यावसायिक प्रशिक्षण विशिष्ट कौशल्य विकसित करण्यावर लक्ष केंद्रित करते जे विद्यार्थ्यांना अधिक रोजगारक्षम आणि बाजारपेठेतील मागणी लक्षात घेवून प्रशिक्षण देते.विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने, विद्यार्थी कल्याणासाठी व रोजगार निर्मीतीसाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहे. कौशल्याधारित आणि व्यावसायिक प्रशिक्षणाची वाढती मागणी लक्षात घेता गोंडवाना विद्यापीठ व गडचिरोली, जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे आणि तत्कालीन जिल्हाधिकारी संजय मीना यांच्या संकल्पनेतून गोंडवाना विद्यापीठ परीसरात अल्फा अकॅडमी हा प्रकल्प




कार्यान्वित करण्यात आला.

अल्फा अकॅडमीच्या माध्यमातून आजतागायत ५०० प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना संगणकीय कोडींगचे प्रशिक्षण देण्यात आले. विशेष म्हणजे, २३३ विद्यार्थ्यांनी नॅस्कॉम ही प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली असून त्यापैकी १५० विद्यार्थ्यांनी इंटर्नशिप पुर्ण केली आहे. तर प्रशिक्षणाच्या माध्यमातून ४५ विद्यार्थ्यांना रोजगार प्राप्त झाला असून जिल्हा प्रशासनाने अल्फा अकॅडमीतील १२ प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची निवड देखील केली आहे. ही विद्यापीठाच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे.

कोडींग प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विविध संस्थांना वेबसाईट तयार करून दिल्या असून विद्यार्थी मोठे अर्थार्जन प्राप्त करीत आहे. ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी फुल स्टॅक वेब डेव्हलपमेंट अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. तसेच C++, HTML, CSS, JS, सॉफ्ट स्किल ट्रेनिंगच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध संगणकीय कोडींगचे धडे मिळतील आणि विद्यार्थी स्वतः वेबसाईट तयार करू शकतील.

त्यासोबतच, जिल्हयातील विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील तांत्रिक प्रशिक्षण मिळावे, या उद्देशाने विद्यापीठ परीसरात सी.आय.आय.आय.टी (CIIIT) प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली. सदर प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री यांच्या हस्ते १५ नोव्हेंबर २०२३ रोजी पार पडले. सदर केंद्रामध्ये वार्षिक १००० विद्यार्थ्यांना तांत्रिक प्रशिक्षण देण्याचे मानस असून सदर प्रशिक्षण इंडस्ट्री ४.० या तंत्रज्ञानावर आधारित असेल. सी.आय.आय.आय.टी (CIIIT) केंद्रात प्रशिक्षणासाठी ९ विभागातील विविध १८ कोर्सेस सुरू आहेत. यामध्ये, ऑटोमोबाईल सेक्टर, खजढ, डिजिटल मॅन्युफॅक्चरिंग, डव्हान्स मॅन्युफॅक्चरिंग इनोव्हेशन डिझाईन, मॅन्युफॅक्चरिंग एक्झिक्युशन सिस्टीम आदी क्षेत्रातील विविध कोर्सेसचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित करण्यासाठी गोंडवाना विद्यापीठातील आदर्श पदवी महाविद्यालयात कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन देखील नुकतेच करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांचा शोध घेणे व त्यांचे नवउद्योजकतेचे स्वप्न साकार करणे व योग्य पाठबळ पुरविण्यासाठी (ढख़उएऋ) ट्रायसेफ नवसंशोधन केंद्राची स्थापना करण्यात आली. केवळ नोकरीवर अवलंबून न राहता युवकांनी स्वयंरोजगार निर्माण करावा, त्यांना स्वावलंबी होता यावे यासाठी गोंडवाना विद्यापीठ संचलीत ट्रायसेफचे कार्य सुरु आहे.

शिक्षणातून नोकरी व उद्योजकता वाढीस लागणे आणि येथील आदिवासी समाजाचा आर्थिक स्तर वाढविणे हा प्रशिक्षणाचा उद्देश आहे. बदलत्या काळात फक्त पारंपारिक शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास व त्यांचे भावी जीवन सुखकर करण्यास पुरेसे नाही. त्यामुळे डिजिटल कौशल्यावर आधारित शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. नियमित अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांनी वेगवेगळी कौशल्ये आत्मसात केली तर त्याचा निश्चितच फायदा होईल.

## इंडिया बुकमध्ये नोंद झालेल्या १९ महिण्याच्या सुरवीची आ.किशोर जोरगेवार यांनी घेतली भेट

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

वयाच्या अवघ्या १९ व्या महिन्यात विविध ९८ वस्तु ओळखणा-या घुग्घुस येथील सुरवी समिंद्र साळवे हिचे इंडिया बुकमध्ये नोंद झाली आहे. दरम्यान आमदार किशोर जोरगेवार यांनी घुग्घूस येथील तिच्या राहत्या जात तिची भेट घेत अभिनंदन केले आहे.

यावेळी यंग चांदा ब्रिगेडचे घुग्घूसचे नेते इमरान खान, प्रेम गंगाधरे, डॉ. गौतम, मयुर केवले, राजू नाथर, मंगेश भोयर, देविदास अमृतकर, आशिष वाघमारे, समींद्र साळवे, पुजा साळवे, अर्चना साळवे, उमा महल्ले, अंजु ठोंबरे, शशिकला वाघमारे, दिपा वाघमारे, स्मिता यदुवंशी, प्रिया गौरकार, आशा टोंगे, संध्या कन्नूर, अंनु सिंग, किरण मदनकर, स्नेहा जेऊरकर, लिखिता ठोंबरे, संजय महल्ले आदींची उपस्थिती होती.

घुग्घुस मधील राम नगर या ठिकाणी वास्तव्यास असणाऱ्या अवघ्या एकोणीस महिन्यांच्या सुरवी या चिमुकलीने आपल्या




अफाट बुद्धिमत्तेच्या जोरावर इतिहास घडवला आहे. फक्त १९ महिन्यांची सुरवी या वयात तब्बल ९८ वस्तू ओळखत असून तिच्या या तल्लख बुद्धीची नोंद 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड' ने घेतली आहे. दरम्यान आमदार किशोर जोरगेवार यांनी सुरवीच्या घरी तिची भेट घेत अभिनंदन केले आहे. यावेळी सुरवीन चित्रातील अनेक वस्तू, पक्षी ओळखून दाखविले.या लहान वयात आपल्या मुलीवर चांगले संस्कार करणारे आणि तिच्या ठायी असणारी बुद्धिमत्ता ओळखणारे पालकही कौतुकास पात्र आहेत. तिचे हे यश नक्कीच अभिमानास्पद असून या चिमुकलीने भविष्यात आपल्या चंद्रपूरचे आणि पर्यायाने देशाचे भविष्य उज्ज्वल करावे, अशी आशा यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केली. यावेळी स्थानिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## एम.एस.अर्चना यांच्या कडून स्ट्राँग रुम मतमोजणी केंद्राची पाहणी

**हिंगोली**–लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने १५-हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निरीक्षक (सामान्य) श्रीमती एम. एस. अर्चना यांनी आज लिंबाळा मक्ता येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात असलेल्या स्ट्राँगरूमची पाहणी केली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. पी. बी. देवसरकर, संपर्क अधिकारी सुनील शिंदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहायक अभियंता गजानन खोरणे उपस्थित होते.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने निवडणूक यंत्रणा सज्ज ठेवली आहे. या व्यवस्थेची पाहणी करण्यासाठी निवडणूक निरीक्षक श्रीमती अर्चना यांनी आज येथील स्ट्राँग रुम, मत मोजणी केंद्राला भेट देऊन पाहणी केली.



हिंगोली लोकसभा मतदारसंघाची निवडणूक २६ एप्रिल २०२४ रोजी होत असून, मतमोजणी ४ जून २०२४ रोजी होणार आहे. यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज आहे. प्रत्येक विधानसभा क्षेत्रात निवडणुकीसंदर्भात चोख व्यवस्था करण्यात आली आहे. या अनुषंगाने श्रीमती अर्चना यांनी येथील स्ट्राँग रुमची पाहणी करून आढावा घेतला. तसेच मतमोजणी वेळी माध्यम कक्ष स्थापन करण्यात येणार असलेल्या जागेचीही त्यांनी पाहणी केली.

निवडणूक निरीक्षक श्रीमती अर्चना यांनी निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे स्ट्राँगरूममध्ये सर्व व्यवस्था आहे का याबाबत पाहणी केली. तसेच विद्युत शॉर्ट सर्कीटमुळे मतदानयंत्रांना हानी होऊ नये याची दक्षता घेण्यासाठी सूचना दिल्या. त्यांनी सीसीटीव्ही यंत्रणा, अग्नीरोधक यंत्रणा, डबल-लॉक सिस्टीम व परिसरातील सुरक्षा यंत्रणेची पाहणी केली. याठिकाणी सिसिटीव्ही, सुरक्षा अलार्म, अग्निशामक यंत्रणा व पुरेसे विद्युत दिवे यांची पाहणी केली. श्रीमती एम. एस. अर्चना यांनी मत मोजणी केंद्रावर स्वच्छतेसह इतर सर्व आवश्यक पायाभूत सुविधेसोबतच उन्हापासून बचावासाठी शेड व पिण्याच्या पाणी या दोन सुविधा प्रामुख्याने उपलब्ध ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

## २२५ विद्यार्थ्यांची चुनाव पाठशाला संपन्न

### पालकांना मुलें घालतील गळ



**सिंदीरेल्वे । प्रतिनिधी**

लोकसभेच्या निवडणुकीत शतप्रतिशत मतदान झाले पाहिजे याकरिता शासनस्तरावर प्रयत्न सुरु आहेत.त्याचाच एक भाग म्हणून येथील प्राथमिक शाळांमध्ये परवा चुनाव पाठशाला योजनेतून २२५ बालकांना कानमंत्र देण्यात आला.

स्थानिक कस्तुरबा प्राथमिक शाळेत भगवंत पवार यांनी न.प.द्वारा संचालित चार शाळांच्या २२५ मुलांशी संवाद साधला.मतदान करणे फार गरजेचे असते,त्यातून योग्य व जनताभिमुक विकास कामांना चालना मिळते.त्यामुळे तुम्ही विद्यार्थ्यांनी पालकांना गळ घालून मतदान करण्यास प्रवृत्त करावे,असे मुलांना समजावून सांगितले.यावेळी सर्व शाळांचे दहा शिक्षक,पालिकेचे प्रशासकीय अधिकारी नंदकिशोर चव्हाण,रमेश पडवे ,तुरक्याल,मनोज तृपकाने आदी उपस्थित होते.

## हिंगणघाट तालुक्यातील बोंदुर्णी गावातील शेकडो महिला व पुरुष कार्यकर्त्यांनी केला भाजपात प्रवेश

### आ.समिर कुणावार यांचे प्रमुख उपस्थितीत स्वीकारला भाजपाचा शेला



**हिंगणघाट । प्रतिनिधी**

हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात दिवसेंदिवस भाजपाचा मोठया प्रमाणात विस्तार होत असून विधानसभा क्षेत्रातील नागरीक, युवा कार्यकर्ते तसेच महीला आ.समिर कुणावार यांचे नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत मोठया प्रमाणात भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहेत.

आज दि. ०५ रोजी हिंगणघाट तालुक्यातील बोंदुर्णी गावातील शेकडो महिला व पुरुष कार्यकर्त्यांनी आ. समीर कुणावार यांचा विधानसभा क्षेत्रातील लोकाभिमुख विकास तसेच कार्यसम्राट आमदार यांची कार्यशैली पहाता मोठ्या संख्येने भाजपात प्रवेश केला.

सदर प्रवेश सोहळ्याचे आयोजन आज दि.५ एप्रिल २०२४ रोजी आ. समीर कुणावार यांच्या स्थानिक जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले.याप्रसंगी प्रामुख्याने शामराव पवार, नरेश पवार, विद्या पवार, गणपत पवार, भिकमचंद पवार, अरुण पवार, काश्मीर पवार, कुमुद फुळमाळी, सुरेश पवार, कांतकला पवार, माला फुलमाळी, अधिका पवार, सुशीला पवार, मालता फुलमाळी, उज्वला फुलमाळी, ताई कुमुद फुलमाळी , कडवी फुलमाळी, पवमिला पवार, ज्योती राऊत, पंढरी फुलमाळी, दामोदर बोभाटे, सुरज धनविज, विठ्ठल झोटिंग, संजय देऊळकर ईत्यादी महिला व पुरुष कार्यकर्त्यांना भाजपात रितसर प्रवेश देण्यात आला. उपरोक्त कार्यक्रम आ. समीर कुणावार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. सदर कार्यक्रमाचे वेळी आ. समीर कुणावार यांचेसह भाजपा जिल्हा उपाध्यक्ष किशोर दिघे, जिल्हा महामंत्री भाजपा आकाश पोहाणे, भाजपा विधानसभा प्रमुख संजय डेहणे, समुद्रपूर ग्रामीण तालुकाध्यक्ष वामन चंदनखेडे, भाजपा शहराध्यक्ष भूषण पिसे, भाजपा शहर कार्यकारी अध्यक्ष संजय माडे, नितीन चंदनखेडे, वामनरावजी खोडे, युवा मोर्चाचे विठू बेनिवार, योगेश खोडे, सरपंच खोडे, विकास इंगळे, समाजसेवक अमोल खंदार, राजु माडेवार इत्यादी भाजपा पदाधिकारी तसेच जेष्ठ कार्यकर्ते उपरोक्त पक्षप्रवेश सोहळ्यास उपस्थित होते.

## ७ व ८ एप्रिलला विनापरवाना ड्रोन प्रक्षेपण व वापर करण्यास मनाई

### पंतप्रधानांच्या दौ-यानिमित्त जिल्हाधिका-यांचे आदेश निर्गमित

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या कालावधीत आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याबाबत संबंधित यंत्रणांना निर्देश देण्यात आले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ८ एप्रिल रोजी चंद्रपूर जिल्हा दौ-याच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे तसेच अवकाशीय उपकरणांद्वारे (फ्लाईंग ऑब्जेक्ट, ड्रोन इत्यादी) चंद्रपूर जिल्ह्याच्या हद्दीत दि. ७ एप्रिलच्या रात्री १२.०१ वाजतापासून ८ एप्रिलच्या रात्री २४ वाजेपर्यंत विना परवाना व बेकायदेशीररित्या ड्रोन प्रक्षेपण व ड्रोनचा वापर करण्यास मनाई आदेश पारीत करण्याबाबत जिल्हा पोलिस अधिक्षक यांचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाला आहे.या प्रस्तावाच्या अनुषंगाने जिल्हादंडाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (१९७४ चे २) मधील कलम १४४ (१)(३) अन्वये चंद्रपूर जिल्ह्याच्या हद्दीत दि. ७ एप्रिलच्या रात्री १२.०१ वाजतापासून ८ एप्रिलच्या रात्री २४ वाजेपर्यंत विना परवाना व बेकायदेशीररित्या ड्रोन प्रक्षेपण व ड्रोनचा वापर करण्यास मनाई आदेश पारीत केला आहे. सदर आदेश ५ एप्रिल २०२४ रोजी जिल्हादंडाधिकारी विनय गौडा यांच्या स्वाक्षरीने पारीत करण्यात आला आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .